ISSN 2278-3954 Saptahik Nagara

साप्ताहिक नगारा

संस्थापक संपादक : दलितमित्र स्व. गोविंदराव गोरवाडकर

R.N.I. No. 16746/67 पोष्टाचा परवाना क्र. एम.जी.एन.३९/२०१८-२०२०

श्री. _____

पत्ता _____

_____

वरील पत्त्यावर अंक न पोहोचल्यास परत पाठविण्याचा पत्ता : मा. संपादक सा. नगारा, ८५२, गोरवाडकर वाडा, मालेगांव कैम्प (नाशिक)

NAGARA WEEKLY

* मंगळवार दि. १ ऑक्टोबर २०१९



गांधी नावाचा महामानव

विडीचा धूर.....

॥ मुक्तक ॥
प्रा.सुरेश भिलकोटकर
मो. : ९४२१६०९४३७
(लेखक मुक्त विद्यापीठात प्राध्यापक आहेत.)

काही माणसं मुळात अवलिया असतात. आपण केलेल्या कृतीचा काय परिणाम होईल याचा कोणताही विचार न करता, येईल तो क्षण आपल्या मनमौजीपणाने जगणारी ही मंडळी असतात. आमचा लुका दाजी असाच. मनात मेईल तसा वागणारा आणि वाटेल तसे करणारा. दाजीच्या कमरेला धोतर, अंगात कोपरी अन त्यावर तीन बटणांचा सदरा. घरात-गावात असताना केवळ कोपरी.. डोक्यात साधी पांढरी टोपी. हातात सतत पेटलेली बिडी. नाका-तोंडातून आगगाडीच्या इंजिनसारखा भकाभका निघणारा बिडीचा धूर... बऱ्यापैकी सावळा रंग.. झुपकेदार मिशांमुळे चेहरा तसा उग्र भासणारा.

दाजी पेशाने परंपरागत शेतकरी.. पण मनात येईल तरच शेतीत जाईल.. 'सतत काम करणे म्हणजे उगाच जीव काढणे.' असे जीवनाचे तत्त्वज्ञान मांडणारा दाजी. त्याला बिडी आणि दारुची जोड.. बायको मात्र सतत राबणारी.. घरात दाजीसहीत खाणारी चार तोंडे असल्याने एकट्या बाईच्या मजुरीवर घर चालणे तसे अवघड. यामुळे घरात साध्या जीवनावश्यक बाबींचा दुष्काळ.. अन् कटकटींचा मात्र सुकाळ. घरात भांडण झाले नाही किंवा बायकोने संताप केला नाही.. असा दिवसच काय पण प्रहरही गेल्याचे त्या घराला आठवणार नाही. घरात कटकट झाली नाही तर भिंतीही बेचैन होतील अशी स्थिती.



लहानपणी एकदा असेच आम्ही तिघे-चौघे मुले गल्लीत खेळत होतो. समोर कृष्णा अण्णाच्या ओसरीवर लुका दाजी एकटाच बिडी ओढत बसला होता. बिडीचे जोरदार झुरके मारीत कधी तोंडातून तर कधी नाकातून पांढरा धूर भसाभसा सोडत होता. त्या धुराचे लोळ एवढे होते की त्यात त्यांच्या मिशा आणि चेहराही गडप होई.. ते चित्र पाहून आम्ही मुले हसू लागलो.. हसत हसत दाजीच्या आजूबाजूला घोटाळू लागतो. दाजीला काय वाटले कुणास ठाऊक? त्यानी आम्हाला जवळ बोलावले म्हटले,

"एऽऽ.. पोरेहोऽऽ आथा यारे.." आम्ही थोडेसे अवखळत काही अवघडत त्याच्याकडे गेलो. आम्ही काही बोलण्याच्या आत दाजी म्हणाला,

"तुम्ही का बरं हासी ऱ्हायनात रे..?"

"नही.. का बरं नही..? ते आसंच.." आम्ही चाचरतच म्हणालो. पण दाजीचा त्या दिवशीचा मूड काही वेगळाच होता. तो म्हणाला,

"तुम्ही मना बिडी पेवाले हासी ऱ्हायनात ना..?"

"नही ओऽऽ दाजी.. बिडी पेवाले नही... तुम्हनी ती बिडी पीसनी धूर काढानी पद्धत भारी शे... त्यान्हं हासू वनं आम्हले..."

"आरे.. मंग त्याम्हा हासासारखं काय शे..?" त्यावरही आम्ही पोरे फक्त हसत राहिलो.. मी म्हणालो, "तुम्ही तो नाकावाटे धूर काढतंस ना... ते लई भारी वाटंस आसे बोलू म्हनी ऱ्हायना.." "नाकवाटे धूर काढानं तुम्हले आवढं अप्रूप वाटंस..? आरे.. हाई ते काहीच नही.. मी ते डोळासवाटेबी धूर काढंस..."

"आँ... खरंच..? दाजी आसे नही ऱ्हात हो... तुम्ही काहीबी सांगतंस.. आम्ही धाकल्ला पोरे शेत म्हणीसनी काहीबी फेकू नका हो दाजी.. "दाजीला चिमटा काढत बालू म्हणाला. यावर दाजी म्हणाला,

"तुम्हले काय खोटं वाटंस..? का चेष्ट वाटंस..? खातरी करानी शेका तुम्हले..? या.. आथा या..!"

"कसाले..? नही ओ दाजीऽऽ नका येडामा काढू आम्हले.. काहीबी खपाडतंस का..? आम्ही धाकल्ला शेतंस म्हणीसनी काहीबी येडाम्हा काढतस बरका तुम्ही..!" सुदाम म्हणाला.

"आरे.. खरं सांगस तुम्हले.. एडाम्हा काढाना काय संबंध शे..? नाकम्हाथीन समदासले धूर नही काढता येस... कारण ती भी एक कला शे... माले त्यान्हाभी पुढली कला माहीत शे.. डोळाम्हाथीन धूर काढानी.. पण ते काय खेळानं काम नही.. पण माले जमंस ते.. तुम्हले जर इस्वास नशी.. अन खातरीच करानी व्हयी.. ते या आथा.. मी डोळ्यासम्हातून धूर काढी दखाडंस.." दाजी.

आमचे कुतूहल अधिकच जागृत झाले. तसे सुदाम म्हणाला. "येऽऽ..आपुन दखुना.. दाजी डोळासमाथीन धूर कसा काढंस ते.." तसे आम्हा तिघांना दाजींनी जवळ बसविले. खिशातून नवी विडी आणि काडीपेटी काढली. आपल्या मिशीत लपलेल्या ओठांत विशिष्ट पद्धतीने बिडी पकडली.. आगपेटीवर एक काडी सर्रकन ओढत तिला दोन्ही हाताच्या ओंजळीचे संरक्षण देत आपल्या स्टाईलने बिडी पेटविली. दाजीच्या बिडीसोबत आमच्या मनातले कुतुहलही चांगलेच पेटले.

नव्या बिडीचे दोन-तीन जोरदार झुरके ओढत दाजीने नाका-तोंडातून धूर ओकला अन काहीतरी वेगळी तयारी करायची म्हणून घसा जोरदार खाकरला. डोळे एक-दोनदा घट्ट मिटत आणि नेहमीपेक्षा मोठे करुन उघडत काहीतरी वेगळी प्रॅक्टीस असल्याचे आम्हाला जाणवून दिले. आम्ही आता डोळ्यातून निघणारा धूर पाहायला आतुर झालो होतो. दाजींनी आम्हाला आणखी जवळ अगदी त्याला खेटून बसायला लावले. दाजीच्या डोळ्यांवरचे लक्ष जराही विचलित झाले तरी धूर दिसणार नाही, असे आम्हाला दाजीने पुन्हा बजावले.

(विडीचा धूर पान १२ वर)

(भूप धूप दरवळला पान १० वरून)

मला तेव्हा कुठे माहीत होते! गीतरामायणाचा शुभारंभ 'स्वये श्रीरामप्रभू ऐकती' या भूपातील गीतानेच बाबुजी उर्फ सुधीर फडके यांनी केला हे देखील ज्ञातच आहे.

आता भूपाचे स्वर घोळवणाऱ्या आळवणाऱ्या हिंदी सिनेगीतांची आठवण जरा ताजी करु या. पहिला मान 'ज्योतिकलश छलके'(लताजी-बाबुजी-भाभी की चुडीयाँ) या गीताचा नंतर लताजींचे 'सावरे रंग रांची' मनात गुंजत राहते. मग आठवण आपल्याला खूप मागे नेते. थेट 'रसिक बलमा'च्या (लता-चोरी चोरी) आर्त सुरावटीकडे! 'ये शाम की तनहाईयाँ'(लता-आह) भरे गीत ओठावर येते 'सायोनारा' (लव-इन टोकियो-लता) हे नाचते उडते गीतही तसेच 'नील गगनकी छाँवमे' (आम्रपाली) ह्यातही असेच भूपाचे स्वर समजतात. त्यातला पुढल्या आलापातील शुद्ध गंधारासह (तार सप्तकातील) येणारा हा कोम गंधार आठवावा. त्यामुळे भूप रागातले आशाजींचे 'इन आँखों की मस्तीमे' विसरणे हा गुन्हाच ठरावा. नंतर 'जहा डाल डाल पर सोने की चिडीयाँ' ची आठवण येते. याशिवाय भूप-देसकार या सरहद्दीवरल गाणीही बरीच असतील. 'चाँद फिर निकला' हे अप्रतिम गाणे- त्यातल्या धैवतातल्या न्यासावर व कडव्यांच्या वरच्या (पंचमाच्या पुढील) स्वररचनांमुळे असेच भूप-देसकार सरहद्दीवरले वाटते. मात्र या संगीतातल्या सरहद्दींचे एक विशेष म्हणजे तिथे चकमक वा गोळीबार होणे नाही. दोन्ही 'प्रांतातले' सूर एकमेकांशी सौहार्दपूर्ण हस्तांदोलन करणारे आणि सुरेल 'माहोल' निर्मिणारे!

हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताच्या प्राचीन ग्रंथकारांनी संगीताची उत्पत्ती देवदेवतांपासून झाली असे मानले आहे. म्हणून राग रागिण्यांना त्यांनी पुरुष व स्त्री रुप देवदेवता रुपात कल्पिले आहे. या रंगाचे त्यांनी चार पद्धतीत वर्गीकरण केले आहे. त्यात सहा पुरुष राग मानले आहेत. प्रत्येक रागाच्या कुटुंबात सहा रागिणी आहेत असे मानले आहे. त्या चार विचार पद्धतिंपैकी एक पद्धती आहे. 'शिवमत' किंवा 'सोमेश्वरमत' (संगती दर्पण, दामोदर पंडित कृत) ह्यानुसार 'पंचम' या नावाच्या रागाची (मी हा राग अजून ऐकला नाही) 'भूपाली' ही रागिणी मानली जाते. 'हनुमन्मतानुसार' भोपाली(भूपाली) ही 'मेघ' रागाची रागिणी मानली जाते. काही अभ्यासकांच्या मते हे वर्गीकरण अवैधानिक मानले गेलेय. अभ्यासकांमध्ये असे खंडन-मंडन किंवा मतमतांतरे चालायचीच. या भूपाली रागिणीचे वर्णन 'संगीत दर्पणात' असे केलंय-

गोरेसे अगं सुधानिधीसी । मुख तुंग उरोज धराधर ते
कुंकम के तन मे अनुलेपन । पीर परी विरहज्वर ते
हर ध्यान रता गमता रसताही । मोहरता विरता धरते
बरनी वनिता वरवारिद की ए । भूपालि भले सुर सागर ते

प्रियतमाचे ध्यान(स्मरण) करत राहणारा, शांतरसमग्न तरीही विरहोत्कंठीत असलेली गौरांगी सुंदरी-अशी ही रागिणी भूपाली त्यात वर्णिली आहे. असे वाचल्यावर मला पूर्वीच्या 'दीपावली' च्या दिवाळी अंकातील राग-रागिण्यांची श्री.दीनानाथ दलालांनी काढलेली देखणी चित्रेच डोळ्यासमोर झळकू लागली.

असे जरी असले (किंवा नसले) तरी आपण सामान्य जनांना भूपाळी ही 'घनश्याम सुंदरा' किंवा 'ज्योतीकलश छलके' या गीताच्या सुरावटीतून कोवळ्या उन्हाचा पिसारा उलगडणाऱ्या प्रभात समयासारखी भावत राहते हेदेखील खरेच.

आणि तिचे अभिजात रुप 'सहेला रे' असे आळवत रात्रीच्या प्रथम प्रहराला कवेत घेऊ पाहते. आपण श्रोत्यांनाही तो उत्कट अनुभव सुखदार्त भूपरुपात समृद्ध करीत राहतो.

■■■

(बिडीचा धूर पान ७ वरून)

आम्ही संपूर्ण लक्ष आता दाजीच्या डोळ्यांवर केंद्रित केले होते. क्षणभर आम्ही आमचेही अस्तित्व विसरलो. अशी सारी परिस्थिती तयार झाल्यानंतर लुका दाजीने आपले कौशल्य दाखविण्यास सुरुवात केली. विडी नव्यानेच पेटविलेली होती. तिचा आणखीन एक मोठा जोरदार झुरका ओढला. त्यासरशी पेटलेल्या टोकाकडची बिडी विलक्षण लाल होत होत गेली.. इतकी की तिच्यात जाळ निर्माण झाला.

आता आम्ही आत्यंतिक एकाग्रतेने त्यांच्या डोळ्यातला धूर बाहेर येण्याची वाट पाहू लागलो. आमचे सर्वांचे लक्ष त्यांच्या डोळ्यांकडे असतानाच त्यांचा बिडीचा हात नकळत खाली आला अन् ती पेटती बिडी सुदामच्या उघड्या मांडीवर दाजीने शांत चित्ताने रगडली. सुदामला बिडीचा भयाण चटका बसला. दाजीच्या डोळ्यांवर केंद्रित झालेला सुदाम त्या चटक्याने असह्य होत जोरदार किंचाळत पळाला. तोपर्यंत दाजीने बालूचा पाय पकडला. त्यावर बिडी रगडत म्हणाला, ''आरे येऽऽ.. पळू नका ना... डोळासमजारला धूर दखाना रे पोरेहो.. बालूवर प्रयोग होत असताना मी दूर पळालो म्हणून वाचलो. पण सुदामची स्थिती पाहण्यासारखी नव्हती. त्याने तोंडात येतील त्या ग्राम्य शिव्या दाजीला हासडल्या.. इतका वेळ आमची तिघांची मानसिक तयारी करुन घेणाऱ्या लुका दाजीच्या बुद्धीचा नि मानसिक स्थितीचा मी विचार करीत होतो. अशा अशिक्षित आणि दिसायला साध्याभोळ्या पण बेरकी दाजीने आम्हा तिघा पोरांना पार भोपे बनविले होते.

(द्वंद्व पान ११ वरून)

त्रास होत होते..... अगदी नकोसे झाले होते हे सगळे. पण मुलीसाठी मी तो केमो घेत होते.....

दुसऱ्या मुलीने फार कष्ट घेतले..... फार फार केले तिने माझ्यासाठी..... नंतर नंतर मला स्वत:लाच मी ओझं वाटू लागली. माझ्यामुळे घरच्या सगळ्यांना त्रास होत होता..... पैसा खर्च होत होता..... अन् हे मला बघवत नव्हतं..... आधीच लग्नामुळे जरा अंगात कणकण होती... मोठ्या मुलीचं लग्न झालं. मात्र छोट्या मुलीचं राहून गेलये..... पण ती छोटी कणखर आहे... हुशार आहे. माझ्यावर गेलीये अगदी. तिचं ती पाहून घेईन. ते पाहण्यात तिला तेवढं समर्थ बनवलं आहे. आता तो आनंदाचा मेघ दिसेनासा झालाये.... ती कामधेनू आता दूरवर वर नाहीये.... तो गिधाड पक्षी आता थांबण्यास नकार देत आहे.... मला जावे लागेल....

'पोरींनो आता सोडून जातीये खरं, पण म्हातारपणी माझी सेवा तुम्ही करणार होत्या ते राहून गेले.... हरकत नाही. मी तुमच्याच पोटी जन्माला येईन.

मुलगी होऊन फार छळेन तुम्हाला. लहानपणी जसा त्रास तुम्ही मला दिला तेवढाच त्रास देईन मीही. चला. माझ्या मुलींनो आता आपल्यातलं द्वंद्व बंद करा. सगळ्यांना सगळं कळलंये... माझ्या उरलेल्या सेवेसाठी नक्की परत येईल. तोपर्यंत रजा घेते....'

झोपते शांत...

खूप दिवस झालेत झोपच नाहीये.....

(RIP मावशी.... आपल्या आत्म्याला शांती लाभो.....

एका मातेस समर्पित....)

■■■